# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Mangrulpir**

**Date of Good Work done** :- **14/11/2022**

**Brief of the work done :-**

लोकमत

## लोकअदालतीने जोडला तुटलेला संसार; पतीसोबत पत्नी गेली आंनदाने नांदायला!

### सामोपचारातून यशस्वी तोडगा : १८० प्रकरणांचा निपटारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मंगरूळपीर** : काही कारणांवरून घटस्फोटासाठी पती-पत्नीचा वाद मंगरूळपीर येथील दिवाणी न्यायालयात सुरू होता. शेवटचा प्रयत्न म्हणून राष्ट्रीय लोकअदालतमध्ये हे प्रकरण ठेवण्यात आले. न्यायाधीश व पॅनलने यशस्वी तोडगा काढल्याने आपसी तडजोड झाली अन् पत्नी ही पतीसोबत नांदावयास गेली.

मंगरूळपीर येथे १२ नोव्हेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोकअदालतीत विविध प्रकारच्या १८० प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. येथील विद्यमान न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व दुसरे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर या न्यायालयात १२ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन केले होते. यावेळी विद्यमान दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर येथील एका प्रकरणात याचिकाकर्त्याने उत्तरवादी विरुद्ध घटस्फोट मिळण्यासाठी दावा दाखल केला होता. परंतु या न्यायालयाचे न्यायधीश व पॅनलने याविषयी वाद मिटवण्यासाठी प्रयत्न केल्याने सदर प्रकरण आपसी तडजोडीने मिटविण्यात आले. तसेच उत्तरवादीही अर्जदारासोबत नांदावयास गेल्याने उभय पक्षांचा ॲड. रश्मी देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या राष्ट्रीय लोकअदालतीत तिन्ही न्यायालयात विविध १८० प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. नागरिकांनी किरकोळ प्रकरणे लोकअदालतमध्ये मिटवून आर्थिक व मानसिक त्रास टाळावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी विद्यमान दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर न्यायाधीश एस. जे. गायकवाड, सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर एन. के. मेश्राम, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आर. एस. मानकर यांच्यासह पॅनलचे सदस्य ॲड. बी. वाय. शृंगारे, ॲड. एस. एन. सरकाळे यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय लोकअदालतीच्या यशस्वीतेसाठी कर्मचारी पी. एम. भगत, शफीक काजी, परमेश्वर चौधरी, देशमुख, एस. वाय. मिर, ए. जे. राजपूत, प्रवीण वाघमारे, एस. एन. देशमुख यांनी सहकार्य केले.